# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024




मार्गदर्शन करताना लेफ्ट. डॉ. संतोष पाटील, व्यासपीठावर संजय बोबडे, विजय पाटील, श्रीगणेश गायकवाड व इतर.

# स्पर्धा परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जा : डॉ. संतोष पाटील

पाटण, दि. १६ : आजचे युग हे स्पर्धेचे असून त्यासाठी तयार असणे आवश्यक आहे. शालेय जीवनापासून स्पर्धा हा विद्यार्थी जीवनाचा अविभाज्य घटक असतो. स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी मानसिकरीत्या तयार असणे गरजेचे असते. योग्य नियोजन केल्यास हे शक्य होते. कोणत्याही स्पर्धा परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे गेल्यास यश निश्चित मिळू शकते, असे मत बाळासाहेब देसाई कॉलेजचे एन.सी.सी. ऑफिसर लेफ्टनंट प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी व्यक्त केले.

कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे रासाटी येथे सुरू आहे. या शिबिराच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कोयनानगरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय बोबडे, माजी पोलीस पाटील विजय पाटील, रासाटीचे सरपंच प्रदीप पाटील, प्रभारी प्राचार्य प्रा. आर. एस. क्षीरसागर, कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल माने यांची उपस्थिती होती.

संजय बोबडे यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न-उत्तरांच्या माध्यमातून संवाद साधला. त्यांनी पोलीस भरतीविषयी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली पोलिसांच्या विविध योजना व महिलांसाठी असलेले कायदे याबाबत मार्गदर्शन केले.

प्रा. श्रीगणेश गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता ओळखल्या पाहिजेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी आज स्पर्धा परीक्षेत यश मिळवीत आहेत. तरी मनात कोणताही न्यूनगंड न बाळगता आपले मत, आपले विचार निर्भयपणे मांडले पाहिजे, असे सांगितले.

यावेळी विजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. सौ. सुषमा कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमोल माने यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रोहन क्षीरसागर यांनी आभार मानले. शिबिरास कोयनानगर पोलीस स्टेशनचे अंमलदार अजय पवार, पोलीस हवालदार शहाजी पाटील, रतन चव्हाण, प्रा. व्ही. टी. चाळके, प्रा. सौ. एन. आर. कुंभार, प्रा. कु. ए. ए. पिटे, प्रा. कु. के. ए. जामदार, प्रा. कु. एस.पी. संकपाळ, रासाटी गावचे ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.